**ठळक बातम्या**

- मराठा समाजाला केवळ आरक्षण देऊन प्रश्न सुटणार नाहीत, त्यामुळे या समाजासाठी विविध योजना सुरू केल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या पूरग्रस्तांसाठी केंद्र सरकारकडून विशेष पॅकेज मिळवून देण्याचं केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचं आश्वासन

- लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी संरक्षण मंत्रालयाचा हिंदुस्तान एअरोनॉटिक्सशी ६२ हजार कोटी रूपयांचा करार

- स्वदेशनिर्मित अग्नी प्राईम क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

**आणि**

- ISSF कनिष्ठ गट विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात भारतीय नेमबाजांनी तिन्ही पदकं पटकावली

**<><><><>**

नोकऱ्या मोठ्या प्रमाणात नसल्यामुळे मराठा समाजाला केवळ आरक्षण देऊन प्रश्न सुटणार नाहीत, त्यामुळे मराठा समाजासाठी विविध योजना सुरू केल्या, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. माथाडी कामगार नेते अण्णासाहेब पाटील यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त आज नवी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात माथाडी कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहं, सारथीमार्फत स्पर्धा परीक्षेची तयारी, अण्णासाहेब पाटील महामंडळाला आर्थिक सहाय्य, मराठा तरुणांना उद्योगासाठी आर्थिक मदत इत्यादी कामांची माहिती त्यांनी दिली..

माथाडी कामगारांची चळवळ मजबूत करण्यासाठी आवश्यक ती मदत करण्याचं आश्वासनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**<><><><>**

अतिवृष्टीचा तडाखा बसलेल्या भागांना मंत्रिमंडळातले सदस्य, अधिकारी आणि विविध राजकीय पक्षांचे नेते भेट देऊन शेतकरी आणि नागरिकांना दिलासा देत आहेत. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी धाराशिव जिल्ह्यात पूरग्रस्त भागाची पाहणी केली. राज्यातल्या पूरग्रस्तांसाठी केंद्र सरकारकडून विशेष पॅकेज मिळवून देण्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करु, तसंच बाधित क्षेत्रातल्या शेतकऱ्यांची कर्जं माफ करावी असं आपण बँकाना सांगणार असून, खासगी कंपन्यांनी या भागातल्या जिल्ह्यांना दत्तक घ्यावं, असं आवाहन त्यांनी केलं. आठवले यांनी आज पूरग्रस्त शेतकऱ्यांशी संवादही साधला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बीड जिल्ह्याचा पाहणी दौरा केला. आपतद्ग्रस्तांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे राहणार असून एकही बाधित व्यक्ती अथवा शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज आपल्या येवला मतदार संघातल्या नुकसानग्रस्त भागांना भेट दिली. ओल्या दुष्काळासाठी असलेले नियम- निकष बाजूला ठेवून राज्य सरकार शेतकऱ्यांना भरपाई देणार असल्याचं त्यांनी सांगितलं. यासाठी राज्य सरकारनं केंद्रशासनाकडे मदत मागितली आहे, असं ते म्हणाले.

शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी हिंगोली जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा आढावा घेतला. हिंगोली जिल्ह्यात बाधित शेतकऱ्यांना 231 कोटी रुपयांची मदत मंजूर झाली आहे. आठवडाभरात ती शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल. चालू महिन्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याची कारवाई अंतिम टप्प्यात असून मदत देण्याची प्रक्रिया प्रशासन सुरु करेल, असं भुसे यांनी सांगितलं.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी धाराशिव जिल्ह्यात भेट देऊन आपद्ग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचं वाटप केलं. जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी नांदेड जिल्ह्यात भेट देऊन पूर परिस्थितीची पाहणी केली.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज लातूर जिल्ह्याला भेट दिली. 'कुणीही टोकाचं पाऊल उचलू नये, सध्या सरकारकडून मिळणारी मदत शेतकऱ्यांनी स्वीकारावी, वाढीव मदत मिळवून देण्याची मागणी आपण लावून धरू', असा विश्वास त्यांनी यावेळी शेतकऱ्यांना दिला.

मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे पिकांचं मोठं नुकसान झालं असून, सरकारनं शेतकऱ्यांना हेक्टरी पन्नास हजार रुपये मदत द्यावी, अशी मागणी काँग्रेसचे विधीमंडळ पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. पूरग्रस्त भागातल्या शाळांच्या परीक्षा पुढं ढकलाव्यात अशी मागणीही त्यांनी केली.

<><><><>

शेतकऱ्यांना तातडीची मदत पोहोचवणं आणि नुकसानग्रस्तांना न्याय देणं हेच सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं. ते आज नागपूर विमानतळावर बातमीदारांशी बोलत होते. कालपर्यंत १७ लाख हेक्टरवरच्या पिकांचे पंचनामे झाले असून, लवकरच यासंदर्भात शासन निर्णय निघेल, असं त्यांनी सांगितलं.

नुकसानीचा अहवाल केंद्राकडे पाठवला जाईल. केंद्र सरकारकडूनही मदत मिळेल, असं ते म्हणाले.

आदिवासी समाजाच्या पडीक जमिनी सौर प्रकल्पासाठी भाड्यावर देण्याची योजना सरकार आणत आहे, त्यामुळे आदिवासी भूधारकांना एकरी ५० हजार रुपयांपर्यंत थेट फायदा मिळेल,  असं बावनकुळे यांनी सांगितलं.

<><><><>

तंत्रज्ञानाद्वारे बँकिंग सेवा सुधारणं आणि नवकल्पनांना महत्त्व देणं गरजेचं आहे, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज पुण्यात बँक ऑफ महाराष्ट्रच्या ९१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. देशाच्या आर्थिक विकासात वित्तीय संस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे, असं त्या म्हणाल्या. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी लघु उद्योगांसाठी युवकांना कर्ज आणि इतर सेवा द्याव्यात, अशी सूचना त्यांनी केली. सीतारामन यांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या नवीन औद्योगिक कार्यालयाचं उद्घाटन आणि झेन लाईफ मोबाईल बँकिंग ॲपचं लोकार्पणही केलं.

<><><><>

संरक्षण मंत्रालय हिंदुस्तान एअरोनॉटिक्स कडून Mk1A प्रकारची ९७ विमानं खरेदी करणार आहे. त्यासाठी ६२ हजार कोटी रूपयांच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या असून २०२७ -२८ या वर्षात ही विमानं हवाई दलात दाखल व्हायला सुरुवात होईल. पुढच्या  ६

वर्षात सर्व विमानं हवाई दलाच्या ताब्यात येतील. या विमानांमधे ६४ टक्के घटक स्वदेशनिर्मित असतील. याखेरीज उत्तम रडार, स्वयम् रक्षाकवच, आणि इतर अद्ययावत यंत्रसामुग्री आणि उपकरणांमुळे आत्मनिर्भरतेच्या अभियानाला चालना मिळणार आहे. सुमारे १०५ भारतीय कंपन्या यात थेट सहभागी असतील आणि दरवर्षी ११ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार त्यातून मिळेल.

**<><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज जाणून घेऊ या संरक्षण निर्यात क्षेत्राविषयी....

- **- - व्हीसी - -**

*(गेल्या अकरा वर्षात भारताच्या संरक्षण क्षेत्राचं सामर्थ्य वाढलं असून ते आत्मनिर्भर होण्याकडे वाटचाल सुरू आहे. संरक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या समावेशासह अनेक क्रांतीकारी बदल झाले आहेत. त्यामुळे उत्पादन झपाट्याने वाढत आहे. यापूर्वी भारताला संरक्षण सामुग्री आयात करावी लागत असे मात्र आता भारत जगातल्या प्रमुख निर्यातदार देशांपैकी एक झाला आहे. सन २०२४-२५ मधे देशाची संरक्षण सामुग्री निर्यात २३ हजार ६२२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. भारत आता अमेरिका, फ्रान्स आणि अर्मेनियासह शंभरहून अधिक देशांना संरक्षण सामुग्रीची निर्यात करतो. यात बुलेट प्रूफ जॅकेट, पेट्रोल बोट, हेलिकॉप्टर्स, रडार इत्यादीचा समावेश आहे. भारत हा संरक्षण सामुग्री निर्यात करणारा जगातला सर्वात मोठा देश करण्याचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.*

- ***- होल्ड बाईट मोदी - -***

*आत्मनिर्भरतेच्या तत्वावर भारताचं संरक्षण धोरण आधारलेलं आहे. येणाऱ्या काळात संरक्षण क्षेत्र बळकट करून विकसित भारताचं ध्येय साध्य करणं हे सरकारचं उद्दिष्ट आहे.)*

**<><><><>**

स्वदेशनिर्मित अग्नी प्राईम क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी झाली आहे. डी आर डी ओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं विकसित केलेल्या या अत्याधुनिक क्षेपणास्त्राचा पल्ला २ हजार किलोमीटरचा असून रेल्वेमार्गावर चालत्या प्रक्षेपण यंत्रणेद्वारे प्रक्षेपित होणारं हे पहिलंच क्षेपणास्त्र आहे. फिरत्या यंत्रणेमुळे हे क्षेपणास्त्र कोणत्याही प्रकारच्या पृष्ठभागावरून, कमी प्रकाशात आणि त्वरित प्रक्षेपित करता येणार आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ही चाचणी यशस्वी झाल्याबद्दल डी आर डी ओ, स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड आणि सैन्यदलाचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><>**

ISSF कनिष्ठ गट विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत आज महिलांच्या ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात भारतीय नेमबाजांनी तिन्ही पदकं पटकावली. अनुष्का ठोकूर हिने सुवर्ण पदक, अंशिकाला रौप्य पदक तर आद्या अग्रवालने कास्य पदक जिंकलं. पुरुषांच्या स्पर्धेत भारताच्या दीपेंद्र सिंग शेखावत याने रौप्य पदक तर रोहित कन्यान याने कास्य पदक जिंकलं.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात सुपर फोर फेरीचा सामना होणार आहे. हा सामना ८ वाजता सुरू होईल. या सामन्यातला विजेता संघ भारताविरुद्ध अंतिम सामना खेळेल. काल झालेल्या सामन्यात बांगलादेशाला नमवून अंतिम फेरीत स्थान निश्चित केलेला भारतीय संघ उद्या संध्याकाळी  श्रीलंकेविरुद्ध सुपर फोर फेरीतला तिसरा सामना खेळणार आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. यामुळे दैनंदिन वापराच्या अनेक वस्तूंच्या किमती कमी झाल्या आहेत. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया….

**-   - -व्हीसी - -**

*(वाहतूक पर्यावरणस्नेही आणि परवडण्याजोगे बनवण्यासाठी सरकारनं सायकल उद्योगावरला जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के केला आहे. यामुळे सायकलचे दर आधीपेक्षा कमी होणार  आहेत. विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि फिटनेसची आवड असलेल्या लोकांना सायकल घेणं आता सहज शक्य होणार आहे. अनेक छोट्या व्यावसायिकांसाठी सायकल एक महत्त्वाचं साधन असतं. दर कमी झाल्यामुळे त्यांना सायकल परवडणाऱ्या दरात उपलब्ध होईल तसंच त्यांच्या पैशाची बचतही होणार आहे. विशेषतः ग्रामीण भाग, निमशहरी भागातल्या नागरिकांसाठी सायकलचे दर कमी झाल्यामुळे*

*नव्या संधीची दारं उघडणारं आहेत. शिवाय यामुळे पेट्रोल, डिझेल इंधनाची बचत होऊन पर्यावरण रक्षणालाही हातभार लागणार आहे. सायकलची मागणी वाढल्यामुळे सायकल उत्पादक कंपन्यांनाही मोठा फायदा होणार आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या विकासासाठी ही बाब अतिशय महत्त्वाची ठरणार आहे.)*

**<><><><>**

जागतिक पातळीवर अनेक आव्हानं आणि अनिश्चित वातावरण असूनही भारताची विकास वाटचाल लक्षणीय असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज उत्तरप्रदेशात ग्रेटर नॉयडा इथं आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचं उद्घाटन करताना बोलत होते. आत्मनिर्भरतेचा मंत्रच भारताला तारून नेईल असं ते म्हणाले. …

**( होल्ड- बाईट- प्रधानमंत्री**

प्रधानमंत्र्यांनी आज राजस्थानात एक लाख २२ हजार १०० कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांचं भूमिपूजन आणि उद्घाटनही केलं.

**<><><><>**

'स्वच्छता ही सेवा २०२५' या अभियानांतर्गत 'स्वच्छोत्सव' उपक्रमांतर्गत आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कौशल्यविकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या उपस्थितीत आज मुंबई महानगरपालिकेच्या ए विभागात श्रमदान करण्यात आलं. यावेळी स्वच्छतेविषयक सामूहिक शपथ घेण्यात आली. स्वच्छतेबरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी मुंबई महानगरपालिका विविध उपाययोजना राबवत असून त्यां अनुकरण राज्यातल्या इतर महानगरपालिकांनी करावं, असं आवाहन एकनाथ शिंदे यांनी यावेळी केलं.

बुलढाणा जिल्ह्यातल्या १३ तालुक्यांमधल्या गावागावांमध्ये स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत श्रमदान करण्यात आलं.

**<><><><>**

‘स्वच्छता ही सेवा’ या सध्या सुरु असलेल्या मोहिमेत आज पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता दिन साजरा होत आहे. **संरक्षणमंत्री राजनाथ सिंग** यांनी नवी दिल्ली इथं संरक्षण मुख्यालयात सफाई कर्मचाऱ्यांना सन्मानित केलं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्र**तापराव जाधव** यांनी निर्माण भवन इथं स्वच्छता मोहिमेत भाग घेतला. स्वच्छता ही सेवा अभियानाअंतर्गत आज ठिकठिकाणी एक

दिवस एक तास एकसाथ उपक्रम राबवून स्वच्छता करण्यात आली.आकाशवाणी मुंबईच्या प्रसारण भवनात झालेल्या स्वच्छता अभियानात कार्यालय प्रमुखांसह वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते.

**वाशिम** रेल्वे स्थानकावर रेल्वे कर्मचाऱ्यांनी एक तास श्रमदान करून रेल्वे स्थानक परिसर स्वच्छ केला.

**परभणी** जिल्ह्यातल्या पिंगळी इथं स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. पालकमंत्री मेघना बोर्डीकर यावेळी उपस्थित होत्या.

पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना आज आदरांजली वाहण्यात येत आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन्, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपाध्याय यांचं स्मरण केलं आहे. मुंबईत राजभवन इथं तसंच नवी दिल्लीतल्या महाराष्ट्र परिचय केंद्रात दीनदयाळ उपाध्याय यांना आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा सेंन्सेक्स ५५६ अंकांची घसरण नोंदवत ८१ हजार १६० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६६ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ८९१ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

हिंगोलीत भाजयुमो अर्थात भारतीय जनता युवा मोर्चाने आज नमो युवा रन - नशामुक्त भारत या मॅरेथॉन स्पर्धेचं आयोजन केलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या या उपक्रमात नागरिकांनी उत्साहाने भाग घेतला.

**<><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात राज्यातल्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><>//**